महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## प्रसिध्दीपत्रक

**(जाहिरात क्र. ०५/२०२३, जाहिरात क्र. ०६/२०२३, जाहिरात क्र. ०७/२०२३ व जाहिरात क्र. ०८/२०२३ )**

-------

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सरळसेवा भरती अंतर्गत खालील नमूद पदे भरण्यासाठी दि. २९/१२/२०२३ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच याबाबत विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती. उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज भरणेकरीता दि.२०/०६/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

| अनु.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नांव |
|---|---|---|
| १ | ०५/२०२३ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) |
| २ | ०६/२०२३ | विद्युत सहाय्यक |
| ३ | ०७/२०२३ | पदवीधर शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |
| ४ | ०८/२०२३ | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |

२. दरम्यानच्या काळात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि.२७/०२/२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरीता (एसईबीसी) आरक्षण जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने उक्त जाहिरातीकरीता सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरीता आरक्षण निश्चित करुन सुधारीत रिक्त पदांचा तपशील दि. २१/०६/२०२४ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातून (EWS) अर्ज केलेल्या उमेदवारांनी एसईबीसी प्रवर्गाचा विकल्प सादर करणे व इतर मार्गदर्शक सूचना प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.

३. सदर मूळ जाहिरातीस अनुसरुन ज्या एसईबीसी उमेदवारांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातून अर्ज भरले आहेत त्यांचेसाठी एसईबीसी प्रवर्गाचा विकल्प सादर करणेबाबची वेबलिंक (URL Link) कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येऊन विकल्प सादर करण्याची तारीख ०४/०८/२०२४ अशी दिलेली होती.

४. **आता, जे एसईबीसी उमेदवार वयाधिकामुळे उक्त पदांकरीता अर्ज करु शकले नाहीत त्यांचेकरीता तसेच इतर सर्व प्रवर्गातील उमेदवारांकरीता ऑनलाईन अर्ज सादर करणेकरीता वेबलिंक (URL Link) कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) उपलब्ध करण्यात येत आहे. सबब, सदर उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दि. १६/०८/२०२४ पर्यंत भरावेत. तदनंतर, अर्ज सादर करणेकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

५. उक्त पदाच्या जाहिराती अंतर्गत ज्या उमेदवारांनी अर्ज भरले आहेत त्यांनी पुनश्च: अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

६. उक्त संवर्गाच्या मूळ जाहिराती तसेच त्यानुषंगाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शुध्दिपत्रकातील/ प्रसिध्दीपत्रकातील अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

**सही/-**

**दिनांक : ०९/०८/२०२४** **सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं)**